परिपत्रक

क्रमांक कॉन/एल.आर.३४/क-१/-९०
पुणे, दिनांक :- 20-१-१९९०

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना
अधिकार अभिलेखातील नोंदी बाबत.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील प्रकरण १० कलम १५० मध्ये नामांतरण नोंदणी पुस्तकांतील नोंदी करणेबाबत / मंजूर करणे बाबत कार्यपध्दती विहित केली आहे. त्यानुसार नामांतरणामध्ये ज्याचा हितसंबंध आहे अशा सर्व इसमांना नोंदी संबंधी लेखी कळविणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही करणेची असताना-ही कांही प्रकरणात नोंदी हितसंबंधिताना नोटिसा न देताच मंजूर करणेत आल्याचे दृष्टोपतीस आलेले आहे ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. तरी यापुढे नोंदी मंजूर करताना कायदेशीर बाबींचे पालन केले जाईल याकडे संबंधितांनी कटाक्षाने लक्ष पुरवावे.

२/- चुकीचे नोंदीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६मधील कलम २४७ अन्वये अपीलाची तरतूद केली आहे. तथापी संबंधिताकडून कांही वेळेस याबाबतीतील अज्ञानामुळे किंवा दुर्लक्षामुळे अपिल केले जात नाही. एखादा प्रकरणी झालेली नोंद चुकीची झाल्याचे आढळून आल्यास एकत्रीकरण अधिकारी व उपसंचालक भूमि अभिलेख यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५७नुसार स्वत:हुन नियमानुसार कार्यवाही करून योग्य आदेश द्यावेत.

सही/- [नवीन कुमार]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, [म. राज्य] पुणे.

प्रत /- सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी [सर्व] / एकत्रिकरण अधिकारी, [सर्व] / उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व] यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत /- कार्यासन अधिकारी क-१ ते क-७ अभिलेखापाल जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालय यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

" नि र्ग मि त "

[signature]
सहाय्यक जमाबंदी आयुक्त,
[एकत्रीकरण] पुणे.

नालबंद/९०
२२८
एकत्रीकरण अधिकारी, सातारा 31 JAN 1990
यांचे - कार्यालय.

बायल दिनांक 31 JAN 1990
क्रमांक.